# दक्षिण भारतातील सत्ता व संगम साहित्य

**दक्षिण भारत :**

ख्रिचनपर्वा च्या सुरूवातीला महाष्म युगाची जागा आंध्र युगाने घेतलेली दिसून येते.
या काळात दक्षिण भारताचा रोमन देशांशी मोठ्या प्रमाणात व्यापार तसेच उत्तर भारतीय संस्कृतीचा प्रभाव देखील वाढला होता. कारणे:
1) व्यापारी 2) राज्यकर्ते उदा. अशोक, सातकर्णी इ.
3) जैन , बौद्ध, तसेच ब्राह्मण धर्म प्रसारक
इ. स. 2 ऱ्या शतकापासून छोट्या मोठ्या राज्यांची निर्मिती, लेखनाला सुरवात, सामाजिक वर्ग निर्मिती झालेली दिसून येते.




दक्षिणेकडील साम्राज्य : या काळात भारताचे दक्षिणेकडील टोक तीन भागात विभागले होते. 1) चोल 2) पांडय 3) चेर ( केरळ )

**चोल**

या साम्राज्यास तोंडाइमंडलम किंवा चोलामंडलम असे म्हणले जाई .
उरैयूर ही राजधानी . व कापसाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध .
एलार नावाच्या चोल राजाने इ. स. पू. दुसऱ्या शतकात श्रीलंका जिंकून 50 वर्षे राज्य केले.
त्याच शतकात कारीकल राजाने पुहार ( सध्याचे कावेरीपट्टणम ) शहर वसवले. कावेरी नदीवर 160 किमी चा बांध बांधला.
त्याच्या काळात बेन्नी चे युद्ध झाले. त्यात त्याने 11 राजांचा पराभव केला. संस्कृत मध्ये कारीकल म्हणजे शत्रूच्या हतींचा नाश करणारा असा होतो.
तत्कालीन चोल राजधानी कावेरी पट्टन वर पट्टीनप्पलाई ही एक कविता आहे .
द्रविड आणि आर्यन संस्कृती यांचा मिलाफ

**पांडय**

पांड्य हा शब्द पंडू म्हणजे जुना या शब्दावरून. सिलपद्दिकरण मध्ये त्यांची राजमुद्रा ही मासा होती असे म्हणाले आहे. .
सर्वात दक्षिणेकडील भाग .
मदुराई ही राजधानी.
यांचा रोमनांशी व्यापार चालत होता. रोमन सम्राट ओगस्टस कडे पांडय राजाने राजदूत पाठवले होते.
या राजांनी राजधानी मदुराई हून कपटपुरम याठिकाणी तर पुन्हा मदुराई याठिकाणी आणली.
त्यामध्ये मोठ्या प्रमाणात संगम साहित्य नष्ट झाल्याचे मानले जाते.
संगम साहित्यात या राजांचा उल्लेख आढळतो.
ब्राह्मणी प्रभाव होता. मातृसत्ताक प्रथा असावी. स्त्री ने राज्यकारभार केल्याचा उल्लेख .
मेगास्थेनीस म्हणतो हे राज्य मोत्यांसाठी प्रसिद्ध .

**चेर ( केरळ )**

पांड्याच्या उत्तरेला व पश्चिमेला वसलेले . वंजी (करूर ) राजधानी रोमनाशी व्यापार. (मसाल्याचा विशेष करून मिरी )
नेदुञ्जल आदान हा पहिला ज्ञात राजा. त्याने स्वत: ला उदयाञ्जल ही पदवी घेतली. (कारण त्याने कुरुक्षेत्र युद्वात सैन्य पुरवले होते)
सेनगुट्टवन हा त्यांचा महान राजा . उत्तरेकडे गंगा प्रदेशा पर्यन्त मजल मारली.
त्याने कनाग्गी येथे मदिर बांधले. त्या देवाची भक्ति करणारा एक पंथ पट्टीणी पंथ उदयाला आला .
मुझारीस हे महत्वाचे ठिकाण . तेथे रोमनाच्या दोन तुकड्या होत्या. ( सध्याचे क्राग्नोनॉर) . तसेच थोंडी नावाचे बंदर
चेरांची नाणी अमरावती परिसरात सापडली. त्यावर धनुश्यबाणाचे चित्र. केरळमधील पट्टणम येथे तांब्याची नाणी सापडली. करूर नदीच्या परिसरात नाण्यावर उठवण्याची कास्यांची

# संघम साहित्य

**संगम म्हणजे सभा :** पांड्य राजवटी मध्ये मदुराई येथे तामिळ कवी आणि तत्वज्ञ यांची जी सभा होत असे त्यास संगम सभा म्हणत.

- संगम साहित्य म्हणजे कवी व भाट यांच्या काव्यात्मक रचना होय. संगम काळास तामिळ साहित्याचा सुवर्ण काळ किंवा ऑगस्टन काळ म्हणतात. हा कालावधी इ. स. पू.300 ते इ. स. 300 पर्यन्त मानला जातो. पांड्य राज्यात तीन संगम सभा आयोजित केल्या गेल्या.

- **पहिली संगम सभा** : पांड्याच्या काळात मदुराई येथे भरली . 549 कवी उपस्थित . या परिषदेत अक्कविवम , परिनादल, मदुणाराई हे साहिती तयार झाले.
- **दुसरी संगम परिषद** : पांड्याच्या काळात कपाटपुरम येथे भरली. 1700 कवींचा सहभाग . तोलकप्पीयम हे साहित्य या मधील
- **तिसरी संगम परिषद** : नक्कीरण याने पांड्याच्या काळात मदुराई येथे भरवली. 449 कवी उपस्थित . या परिषदेत तिरुकूलर, सिलपद्दीकरण, मनिमेखलाई , जीविका चिंतामनी हे साहित्य तयार झाले.

## संगम साहित्य

### निवेदनात्मक ग्रंथ

- यात शौर्यगाथा वर्णन करणारे काव्य
- 18 प्रमुख ग्रंथ . 10 गोपगीत ग्रंथ व 8 स्तबक ग्रंथ
- याला मेलकन्नकू असेही म्हणतात.

### उपदेशपर ग्रंथ

- यात आचरणाचे नियम
- बराच भाग प्राकृत व संस्कृत ब्राह्मनाने लिहिला
- 18 ग्रंथ . दुय्यम ग्रंथ म्हणून ओळख.
- याला किलकन्नकू असेही म्हणतात

### संगम साहित्य

1) **तोलकप्पीयम**: तलकप्पीयर याने लिहिले. तामिळ व्याकरण .

2) **तिरुकुरल** : तिरूवल्लवर याने लिहिले. तामिळ चे बायबल तसेच पाचवा वेद म्हणले जाते.धर्म , अर्थ , काम , आणि मोक्ष याचा उल्लेख.

3) **सिलपद्दीकरन** : इलाङ्गो आदिगल याने हे महाकाव्य लिहिले. कोवलण आणि माधवी यांची प्रेमकथा.

4) **मनिमेकलाई** : सिलपददीकरन चा पुढचा भाग . सत्तालाई सत्तनार यांनी लिहिला.

5) **जीवगा चिंतामणी** : तिरूतकदेवर या जैन कवीने लिहिले.

## दक्षिणेकडील साम्राज्या संदर्भात काही महत्वाचे.

- मेगास्थेनीस याला पांड्य राजाविषयी माहिती होती.
- अशोकाच्या कोरीव लेखात चोल, चेर, पांड्य यांचा उल्लेख
- संगम साहित्यात गंगा , शोन, तसेच पाटलीपुत्र यांचा नामोल्लेख .
- या काळातील उत्तर व दक्षिण भारत संबंध तमिझकम म्हणून ओळखले जातात.
- दक्षिणेतून सोने , चांदी, मोती यांचा उत्तर भारतात पुरवठा .
- मुरूगन या देवाची पूजा डोंगराळ प्रदेशातील लोक करत
- तुंगभद्रा व कृष्णा च्या दक्षिणेकडील प्रदेश तमिलगम म्हणून ओळखला जात असे.
- क्षत्रीय व वैश्य यांचा उल्लेख नियमित वर्ण म्हणून संगम साहित्यात .
- सेनापतीला एणाडी ही पदवी होती. अरासर हा राजकीय वर्ग
- कदैशियार यांजकडून शेतीची कामे करून घेतली जात.
- परियार हे शेतमजुर होते.
- व्यापार हे आर्थिक जीवनाचे महत्वाचे अंग .
- जैन व बौद्ध धर्मोपदेशक येथे आलेले दिसतात.